डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,
विभागीय कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही ४४१२२२ जि. चंद्रपूर.
E-mail : adrzarssindewahi@pdkv.ac.in

जावक क्रं. ससंसं/विकृसंके/कंत्राटी मजूर/३० /२०२६ दिनांक१५ /०४/२०२६

# निविदा सुचना

प्रति,

१.

२.

३.

**विषय :- सन २०२६-२७ मध्ये कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही जि. चंद्रपूर प्रक्षेत्रावरील संशोधनात्मक प्रयोगांचे विविध कामे कंत्राटीपध्दतीने करण्याकरीता अकुशल व कुशल मजुरांचे (स्त्री/ पुरुष) प्रति दिवसानुसार दर पुरविणेबाबद.....**

उपरोक्त विषयास अनुसरून कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही जि. चंद्रपूर कार्यलयाचे प्रक्षेत्रावरील संशोधनात्मक प्रयोगांचे (साधारणत: १० ते १२ हेक्टर क्षेत्र) व बिजोत्पादन कार्यक्रमांतर्गत कृषि यंत्रे व अवजारे, ट्रॅक्टर चालविणे व नियमित देखभाल करणे ई. विविध कामे करण्याकरीता मजुरांचे (स्त्री/ पुरुष) दर प्रति दिवस करीता कंत्राटदाराकडून निविदा (कोटेशन) मागविण्यात येत आहे.

## निविदा (कोटेशन) मसुदा

| अ. क्र. | विवरण | अकुशल मजूर /पिक राखणदार | | कुशल मजूर/ट्रॅक्टर, कृषि यंत्रे व अवजारे चालक | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रति दिन प्रति मजूर वेतन रू. | प्रति महीना प्रति मजूर वेतन रु | प्रति दिन प्रति मजूर वेतन रू. | प्रति महीना प्रति मजूर वेतन रु | |
| १. | संस्थात्मक शेतीकरिता किमान वेतन | १८०/- | ४६८०/- | २४०/- | ६२४०/- | |
| २. | सुधारित विशेष भत्ता | १६३.८०/- | ४२५९/- | १६३.८०/- | ४२५९/- | |
| एकूण किमान वेतन (किमान वेतन नियमाप्रमाणे) | | ३४३.८/- | ८९३९/- | ४०३.८/- | १०४९९/- | |
| ३. | राज्य कामगार विमा (रा. का .वि. म. नियमाप्रमाणे) कामगाराचे योगदान (३.२५ %) | ११.१७/- | २९०/- | १३.१२/- | ३४१/- | |
| ४. | कामगार भविष्य निर्वाह निधी (का.भ.नि.नि. नियमाप्रमाणे) कामगाराचे योगदान (१३%) | ४४.६९/- | ११६२/- | ५२.४९/- | १३६५/- | |
| एकूण रक्कम (१+२+३+४) | | ३९९.६६/- | १०३९१/- | ४६९.४१/- | १२२०५/- | |
| ५. | सेवा कर | | | | | |
| एकूण रक्कम (१+२+३+४+५) | | | | | | |

**नोट:१. उपरोक्त नमुद दर हे किमान वेतन कायदयानुसार असून यापेक्षा कमी दर ग्राह्य धरण्यात येणार नाही. कंत्राटदारास लागू असल्यास इतर बाबी योग्य स्पष्टीकरण व कागदपत्रासह नमूद करू शकतात.**

**२.विभागीय कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही जि. चंद्रपूर ही डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विदयापीठ, अकोला अंतर्गत कृषि संशोधन केंद्र/ कृषि संबंधित कामे असल्यामुळे मनुष्यबळ पुरविण्याकरिता (GST Act Notification no. 12/2017 Central Tax rate Dated 28/06/2017) GST लागु नाही.**

-१/४-

Scanned with OKEN Scanner

**अटी व शर्ती:**

१. निविदापत्रक / कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.१५ वा. यावेळेतच स्विकारल्या जातील.

२. निविदा / कोटेशन सहयोगी संशोधन संचालक, कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही जि. चंद्रपूर याच्या नावाने सिलबंध लिफाफामध्ये पाठविण्यात याच्यात.

**३. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिलानुसार दि २९/०४/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सिलबंद लिफाफामध्ये सादर करावी.**

४. कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असणे आवश्यक आहे. कंत्राटदारास परवाना व संबंधित इतर सर्व कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

५. कंत्राटीपद्धतीने प्रक्षेत्रावरील संशोधनात्मक प्रयोग व इतर संबंधित कामे करण्याकरीता वापरण्यात येणा-या स्त्रि किंवा पुरूष मजूराच्या व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

६. कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही जि. चंद्रपूर येथिल प्रक्षेत्रावरिल संशोधनात्मक प्रयोग, बिजोत्पादन कार्यक्रम व इतर संबंधित कामे करीत असताना पिकांचे नुकसान झाल्यास विदयापिठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

७. प्रक्षेत्रावरील संशोधनात्मक प्रयोग व इतर संबंधित कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना, अपघात, जिवितहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी, अधिकारी किंवा विदयापिठ जबाबदार राहणार नाही. याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

८. सर्व कामे पुर्ण करण्यात यावे, कामाबाबत तक्रार असल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही. विदयापिठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.

९. निविदामधिल संबंधित कामे कंत्राटी पद्धतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करण्यात यावे. तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील. करासंबंधी कोणतीही तक्रार असल्यास विदयापिठ जबाबदार राहणार नाही.

१०. कंत्राटदाराने देयक सादर करतेवेळी बॅंक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी अन्यथा देयक सादर करण्यात येणार नाही.

११. कंत्राटी कामगाराच्या देयकास कामगाराच्या नावाची यादी, हजेरी व त्यानूसार पी. एफ. भरल्याची पावती व आदेश जोडणे ई. ची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१२. या कार्यालयातर्फे कंत्राटदारास बिजोत्पादन कार्यक्रम, संशोधन प्रयोगासंबंधी कामे करण्याकरीता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. संबंधित काम करण्याकरिता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१३. प्रक्षेत्रावरील कामे करीत असताना कोणताही वादविवाद निर्माण झाल्यास सदर वादविवाद विभागाचे अधिकारी मा. सहयोगी संशोधन संचालक, विभागिय कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही जि. चंद्रपूर यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. सहयोगी संशोधन संचालक, विभागिय कृषि संशोधन केंद्र, सिंदेवाही जि. चंद्रपूर यांचा राहील आणि तो निर्णय सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१४. प्रक्षेत्रावरील संशोधनात्मक प्रयोग,बिजोत्पादन कार्यक्रम व इतर संबंधीत कामे ही एक वर्षामधिल खरीप,रब्बी व उन्हाळी या तिनही हंगामाकरीता असून कामाचे दर ११ महिनाकरीता वैद्य राहतील.



Scanned with OKEN Scanner

१५. कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही जि.चंद्रपूर, अंतर्गत संपूर्ण विभागाचे प्रक्षेत्रावरील धान बिजोत्पादन कार्यक्रम, धान संशोधन प्रयोग संबंधित कामे करीत असतांना पिकाचे तसेच वाहन विभाग संबंधित तांत्रिक कामे करीत असतांना यंत्राचे / वाहनांचे / नविन सुटया भागाचे ई. नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.

१६. निविदाचा काही भाग किंवा संपूर्ण निविदा स्वीकारण्याचा वा नाकारण्याचा अधिकार कार्यालय प्रमुखास राहील.

१७. कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही जि.चंद्रपूर, अंतर्गत प्रक्षेत्रावरील धान बिजोत्पादन कार्यक्रम, धान संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहन विभाग तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे **१८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षा** पेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसून ते शारीरिक दृष्टया सक्षम असावेत.

१८. कृषि संशोधन केंद्र,सिंदेवाही जि.चंद्रपूर, अंतर्गत प्रक्षेत्रावरील धान बिजोत्पादन कार्यक्रम, धान संशोधन प्रयोग संबंधित कामे तसेच वाहन विभाग तांत्रिक कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचा-यांकडे संबंधित तांत्रिक कामाची पदविका / आटीआय प्रमाणपत्र / वाहन चालविण्याचा परवाना व कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

१९. पुरवठा धारकाचे मजुर पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असतील त्यात विद्यापीठ प्रशासनाची कोणताही संबंध कामावर ठेवण्याबाबत राहणार नाही. मजुरांची कुठल्याही प्रकारची कामावर असल्याची जेष्ठता यादी विभागामार्फत देण्यात येणार नाही.

२०. **कामाच्या आवश्यकतेनुसार मजुर उपलब्ध करून दयावे लागतील.**

**२१. मजुरांची कामाची वेळ ही शासकीय नियमाप्रमाणे आठ तास ठरवून दिल्याप्रमाणे राहील.**

२२. एखादया कंत्राटी मजूरास कुठल्याही दिवशी कामावर हजर राहणे शक्य नसल्यास अशा परिस्थितीत पर्यायी व्यक्तींची व्यवस्था लावण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार संस्थेची राहील.

२३. कोणत्याही कंत्राटी कामगारास कामावर ठेवणे व काढून टाकणे याबाबत संपूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीत अधिका-याकडे असतील.

२४. कामावरील कंत्राटी कामगारास अपघात विमा, महागाई भत्ता, भविष्य निर्वाह निधी खाते व वेळोवेळी शासन निर्णयानुसार कंत्राटी मजूरांचे देय लाभ उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी सेवा पुरविणारा कंत्राटदार/ संस्था यांची राहील.

२५. सेवा पुरविणा-या कंत्राटदारास बाल मजूर कायदयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

२६. कंत्राटदाराने नेमलेल्या मजूराचा पगार, रजा, उपदान, बोनस, विमा योजना, पी. एफ. तसेच ईएसआयसी ईत्यादी देय बाबी तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय/वेतन देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबतीत काही तंटा निर्माण झाल्यास कार्यालय हस्तक्षेप करणार नाही अथवा कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची अथवा विदयापिठाची राहणार नाही.

२७. कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायदयानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा. हजेरी नोद, वेतन वाटप नोद, दैनंदिन कामाच्या नोंदी इ. नोंद वहया ठेवणे व ते संबंधित प्राधिकरणादवारे तपासून घेणे बंधनकारक असून, त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार/ पुरवठादाराची राहील.

२८. मजूराच्या वैयक्तिक खात्यावर पी. एफ. व इतर भरणा केलेले चलान/ पावती प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात देयक सादर करतेवेळी सादर करणे बंधनकारक राहील.

२९. प्रत्येक मजूरास साप्ताहिक सुटी देणे बंधनकारक राहील याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.



Scanned with OKEN Scanner

३०. कंत्राट पद्धतीने मजूर पुरवठा करण्याचे काम सब कॉन्ट्रॅक्टर/ कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही तसे केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांचा करार रदद करण्यात येईल आणि त्यानंतर कार्यालयाचा तसेच विदयापिठाच्या कोणत्याही प्रक्रियेत संबंधित कंत्राटदारास भाग घेता येणार नाही.

३१. पुरविण्यात येणा-या कुशल व अकुशल मजूरांचा ई. एस. आय.सी उतरविणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. त्याबाबतची कायदेशिर जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३२. सदर संस्था/कंपणी/ठेकेदार असमाधानकारक काम असेल तर सदर संस्थेचे कंत्राट कोणत्याही क्षणी रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीकत्याकडे असतील.

३३. सदर बाबतचे देयक सादर करण्याची जबाबदारी कंत्राटदारी कंत्राटदार संस्थेची राहील.

३४. कंत्राटदारामार्फत प्रक्षेत्रावर काम करीत असलेल्या कुशल/ अर्धकुशल/ अकुशल स्त्री/ पुरुष मजूरांना विदयापिठ आस्थापनेवर नियमित सेवा मागण्याचा अथवा त्यासंबंधी न्यायालयीन प्रकरण दाखल करण्याचा अधिकार राहणार नाही. भविष्यात अशी कोणतीही परिस्थिती निर्माण झाल्यास याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

३५. कामाचा आदेश मिळालेल्या कंत्राटदारास प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष काम सुरू असताना काम सुरळित चालण्याच्या दृष्टिने कंत्राटदार स्वत: अथवा पूर्णवेळ पर्यवेक्षक नेमून कामाचा सतत पाठपुरावा व देखरेख करणे बंधनकारक राहील. हे कार्यालय किंवा संबंधित विभागाचे कर्मचारी त्यामध्ये गुंतून राहणार नाही. तसेच सुरळित व वेळेत काम पुर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी ही कंत्राटदाराची राहील.

३६. निविदा उघडल्यावर किमान वेतनापेक्षा जास्त मात्र तुलनेने लघुत्तम दर सादरकर्त्याशी दराबाबत वाटाघाटीचे अधिकार निविदा समितीस राहील.

३७. कंत्राटदाराने कामावर ठेवलेल्या मजुरांचे हजेरीपत्रक कामाच्या प्रत्येक ठिकाणी ठेवणे आवश्यक आहे. तसेच संबंधित विभागप्रमुख यांना केव्हाही हजेरी पत्रक तपासण्याचा अधिकार राहील. सदर तपासणीमध्ये मजूर कामावर न आढळल्यास गैरहजेरी मांडण्यात येईल.

३८. प्रक्षेत्रावरील कामकाज सुटीच्या दिवशीही चालत असल्याने वेळोवेळी मजुरांना सुटी देणे, कमी- जास्त प्रमाणात पिक हंगामानुसार मजूर पुरवठा करणे व प्रत्येक मजुरांना साप्ताहिक सुटी देणे बंधनकारक राहील व याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३९. या प्रक्रियेबाबत कुठलेही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास न्यायालयाचे अधिकारक्षेत्र हे चंद्रपूर जिल्हा न्यायालय राहील.

४०. कोणत्याही अटी व शर्ती किंवा नियमांचे उल्लंघन झाल्यास किंवा इतर अपरिहार्य स्थिती उदभवल्यास किंवा इतर वैध कारणास्तव निविदासूचना रदद करणे किंवा कंत्राटदाराचे कंत्राट प्रक्रियेच्या कोणत्याही स्तरावर रदद करण्याचे सर्व अधिकार सहयोगी संशोधन संचालक, वि. कृ.सं.कें. सिंदेवाही, जि. चंद्रपूर यांना राहील.

४१. वरील क्र. ०१ ते ४१ च्या अटी व शर्ती मान्य असल्यासच निविदा भराव्या तसेच निविदा उघडल्यानंतर त्यामध्ये निविदामधिल विशिष्ट अटी व शर्ती अमान्य असल्याचा शेरा नमुद केल्यास अशा निविदा नाकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सहयोगी संशोधन संचालक,
विभागीय कृषि संशोधन केंद्र,
सिंदेवाही जि.चंद्रपूर.



Scanned with OKEN Scanner